दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २५४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१४ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## नवी मुंबई पोलीस आयुक्तपदी मिलिंद भारंबे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अखेर राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या व बढतीना मुहूर्त मिळाला आहे. विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी राज्य सरकारने अधिकाऱ्यांच्या बदल्या संदर्भात मोठा निर्णय घेतला. यानुसार, सुपरकॉप अशी ओळख असलेले विश्वास नांगरे पाटील यांना एसीबी आडीजी करण्यात आले आहे.

याशिवाय, मिलिंद भारंबे पदोन्नतीवर नवी मुंबईचे पोलीस आयुक्त झाले आहेत. अमिताभ गुप्ता यांच्याकडे राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेची तर कोकणचे आयजी संजय मोहिते यांच्याकडे लॉ अँड ऑर्डरची जबाबदारी असेल. सरकारने १५ अधिकाऱ्यांच्या बदल्या तर पाच अधिकाऱ्यांच्या पोस्टिंग केल्या असून, त्यांच्या नियुक्तीचे आदेश लवकरच येतील.

# पुणे बंदला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पुणे**

**छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी खस्ता खाल्लूया, त्यांचे संपूर्ण आयुष्य त्यांनी वेचले असे असतांना त्यांचा सन्मान व्हावा हे सांगण्याची आज वेळ येते ही शोकांतिका आहे. मी याआधीही माझी भूमिका मांडली आहे. ज्या प्रमाणे नूपुर शर्मा यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली त्याच पद्धतीने शिवरायांचा अवमान करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार उदयन राजे भोसले यांनी केली आहे. राज्यपालांविरोधात पुण्यात बंदची हाक दिली होती. त्यात उदयनराजे भोसले सहभागी झाले होते. यावेळी ते बोलत होते.**



राज्यपाल भगतसिंग कोशैयारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यानंतर पुण्यातील विविध संघटनांनी आणि पक्षांनी मिळून आज पुणे बंदची हाक दिली आहे. पुण्यातील व्यापारी त्याचप्रमाणे रिक्षा चालक, हमालपंचायत, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना आदींनी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पुण्यातील डेक्कन परिसरातील छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास खासदार छत्रपती उदयनराजे यांनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर निषेध रॅलीला सुरुवात झाली. यामध्ये शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे, काँग्रेसचे नेते माजी आमदार मोहन दादा जोशी, माजी मंत्री रमेश बागवे, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, प्रवक्ते अंकुश काकडे, रूपाली ठोंबरे सहभागी झाले.

उदयनराजे भोसले म्हणाले, आज मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झाले. यावरून ३५० वर्षानंतरही महाराजांबद्दल प्रेम आणि आदर किंचितही कमी झालेला दिसत नाही. ज्या वेळी मी रायगड ला गेलेलो तेव्हा मला वेदना झाल्या. काही फुटकळ आणि विकृत लोक कारण नसतांना विधाने करतात असे म्हणत त्यांनी राज्यपाल आणि आक्षेपार्ह विधान करणाऱ्यांवर निशाण साधला. उदयनराजे भोसले म्हणाले, शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी आयुष्य वेचले. आज त्यांच्या सन्मान व्हावा हे सांगण्याची वेळ आली आहे, ही शोकांतिका म्हणावी लागेल. मी याआधी माझी भूमिका मांडलेली आहे. पक्ष हा नंतर चा भाग आहे. ज्या प्रमाणे नूपुर शर्मा यांच्यावर पक्षाने शिस्तभंगाची कारवाई केली, त्याच पद्धतीने महाराजांबद्दल आ–क्षेपार्ह विधाने करणाऱ्यांविरोधात व्हायला हवी. आज जे पुण्यात आंदोलन झाले, तशीच भावना ही संपूर्ण राज्याची आहे, असे देखील उदयन राजे भोसले म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट झाली. मात्र, त्यांनी कुठलीच कारवाई केली नाही, हा प्रश्न विचारला असता उदयन राजे भोसले यांनी बोलण्याचे टाळले.

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून...

## वैज्ञानिक प्रज्ञेश म्हात्रे यांना परदेशातील शिक्षणासाठी पाच लाख रुपयांची मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वैज्ञानिक प्रज्ञेश लक्ष्मण म्हात्रे यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी परदेशात संधी मिळाली असून त्यांच्या भरारीला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने पाच लाख रुपयांची आर्थिक मदत करून बळ दिले आहे. प्रज्ञेश म्हात्रे युनायटेड स्टेट अर्थात अमेरिकेत एअरोस्पेस इंजिनिअरिंग प्रोग्राम या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणार आहेत.

सदरचा धनादेश श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रज्ञेश म्हात्रे यांना आज (दि. १३) सुपूर्द केले. यावेळी प्रज्ञेश यांचे वडील लक्ष्मण म्हात्रे, अनिल पाटील, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे कार्यलयीन व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.





सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या २५ पेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. प्रज्ञेश म्हात्रे यूएस मधील ॲरिझोना स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये एअरोस्पेस इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणार असून त्यांना या उच्च शिक्षणासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत केली तसेच पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.

# जलयुक्त शिवार अभियान पुन्हा सुरु करणार

### राज्यातील गावे पुन्हा जलसमृद्ध होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जलयुक्त शिवार अभियान २.० सुरु करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यापूर्वी जलयुक्त शिवार अभियान २०१५–२०१९ या कालावधीत राबविण्यात आले होते व ३९ लाख हेक्टर शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्या होत्या. आता नव्याने सुरु होणाऱ्या या अभियानात येत्या ३ वर्षात सुमारे ५ हजार गावे नव्याने समाविष्ट केली जातील.

जलयुक्त शिवार अभियान २२ हजार ५९३ गावात राबविण्यात आले व यामध्ये ६ लाख ३२ हजार ८९६ कामे पूर्ण झाली. तसेच २० हजार ५४४ गावे जल परिपूर्ण झाली. या कामांमुळे २७ लाख टीसीएम पाणीसाठा क्षमता निर्माण झाली. तसेच कृषीचे विशेषत: रब्बीतील उत्पादनही वाढले. जलयुक्त शिवार अभियान टप्पा–२ मध्ये प्रथम टप्प्यातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम न राबविलेल्या पात्र गावांमध्ये मृद व जलसंधारणाची कामे घेण्यात येतील. त्याचप्रमाणे ज्या गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियानाचा पहिला टप्पा राबविला गेला आहे पण अद्याप गावांमध्ये पाण्याची गरज आहे तेथे देखील ही कामे लोकसहभागातून करण्यात येतील.

या अभियानासाठी जलयुक्त शिवार अभियान पहिला टप्पा, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प व आदर्श गाव तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकासाची कामे पूर्ण झालेली गावे वगळता उर्वरित गावे निवडण्यात येतील. गाव आराखडा तयार करताना पाणलोट क्षेत्र हा नियोजनाचा घटक राहील. अंतिम आराखड्याला ग्रामसभेची मान्यता झाल्यानंतर तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. गाव आराखड्यानुसार कामे झाल्यानंतर गावाचा जल परिपूर्णता अहवाल तयार करण्यात येईल. पूर्ण झालेल्या योजनांसाठी देखभाल दुरुस्ती परिरक्षण देखील करण्यात येईल. गावांमधील ग्रामस्थांची जल–साक्षरता अभियानाद्वारे जनजागृती देखील करण्यात येईल. पिकाच्या उत्पादकतेमध्ये शाश्वतता आणणे त्याचप्रमाणे सामुहिक सिंचन सुविधा निर्माण करणे या व इतर बाबींचा आराखड्यामध्ये समावेश असेल.



जलयुक्त शिवार अभियानाच्या संनियंत्रणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुका स्तरावर उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या असतील. कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी ३ लाखांपेक्षा अधिकचे काम ई–निविदेमार्फत करण्यात येईल. सर्व मृद व जलसंधारण कामाचे मॅपिंग करून नकाशे अद्ययावत करून जिओ पोर्टलवर टाकण्यात येतील.

# कालवा सफाईची दिरंगाई

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील शेतीला काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून दरवर्षी डिसेंबर महिन्यात साध–ारणतहा १५ तारीख नंतर सोडले जाते. कालव्यात मोठ्या प्रमाणात गाळ, दगड, शेवाळ तसेच झाडी झुडपे वाढली, रान माजले असून ते आता लवकरात लवकर पाणी सोडण्याआधी स्वच्छ करावे अशी मागणी जनतेकडून केली जाते. कालवा सफाईला यंदाही दिरंगाई होणार कि काय? असा सवालही जनते मधुन विचारला जात आहे. चक्क डिसेंबरचा पंधरवडा संपत आला, अजुनही साफसफाईचीच प्रतिक्षा आहे. निर्माल्य प्लॅस्टीक पिशव्या कचऱ्याचा खच संपूर्ण शहरातील कालव्यात साचला आहे. रब्बी हंगामातील पीक घेणारे शेतकरी कालव्याला पाणी कधी सुटणार याच्या प्रतीक्षेत आहेत.

माणगांव शहरातून जाणाऱ्या कालव्याचा विचार केला तर कालव्याचे गटारं झाले असुन मोठ्या प्रमाणात त्यात प्लास्टीक कुडाकचरा, काच बाटल्या, हारतुरे, घरातील घाण जुनेकपडे यालाच उकीरडा समजुन येथील अनेक नागरिक सकाळी मॉर्निंग वॉक च्या बहाण्याने, निर्माल्य भरलेल्या रंगबिरंगी प्लास्टीक पिशव्या मोठ्या भक्तीपूर्ण अंतःकरनाने वाहत्या पाण्यात सोडतात. कोणताही विचार न करता सहजी फेकतात. याला म्हणावे तरी काय ? असे चित्र पाहिल्याचे अनेक प्रत्यक्षदर्शींनी आमच्या जवळ बोलताना सांगितले. या आधीच कालव्यात व दूतर्फा अनावश्यक रानं, झाडे झुडप दाटीवाटीने माजुन त्यांची मुळ खोलवर शिरलीत.

जलदगतीने यांत्रीक सफाई करताना कालव्याच्या तळाची माती उखडल्याने पाणी गळतीच्या समस्येलाही सामोरे जावे लागते. व जिथे आवश्यक नाही तिथे सध्या 'काटान' म्हणजेच कडधान्याच्या शेतीतही पाणी शिरल्याने नुकसान होण्याची शक्यता वर्तविली जाते.. त्यामुळे कालव्याचे आतुन देखील व्यवस्थित बांधकाम करण्याचीही आवश्यकता आहे. हेच कालव्यातील पाणी पुढे उन्हाळ्यात पाण्याची कमतरता असताना नदीत सोडले जाते व ते पिण्यासाठी वापरतात. याचे प्रदुषण ही दिवसें–दिवस मोठी समस्या आहे.

कालव्याच्या स्वच्छते संदर्भात माणगांवकरांना वारंवार सांगुन देखिल बेजबाबदारपणे कालव्यात कचरा टाकत असल्याने येथील नगरपंचायत स्वच्छता सेवक नाराजी व्यक्त करीत हैराण झाले असल्याचे आमचेशी आपल्या भावना व्यक्त करताना वर्तमान पत्रा–तून याबद्दल मांडा अस बोलतात. वारंवार बातम्यांच्या माध्यमातून संबंधित अधिकारी वर्ग तसेच राजकीय मंडळींचे लक्ष वेधण्यासाठी पाठपुरावा केला आहे. माणगांव पाटबंधारे कार्यालयातील उपविभागीय अधिकारी श्रीकांत महामुनी यांचेकडून माहिती घेतली असता, यांत्रिक विभागाकडून कालवा सफाईसाठी २ मशीनच्या सहाय्याने धरणाची वाडी येथे सफाई सुरू आहे. लवकरच माणगांव शहरात देखिल कालवा स्वच्छतेचे काम सुरू होऊन डिसेंबर अखेरपर्यंत कालव्याला पाणी सोडले जाईल. असे त्यांनी आश्वस्थ केले आहे.



# कर्जत शहरातील तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश




**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात कर्जत शहरातील तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत आज जाहीर प्रवेश केला.

मयूर दाभणे, विठ्ठल झुंजारराव, अविनाश शिंदे या युवकांचा आज प्रवेश झाला असून कर्जत तालुक्यातील विविध भागातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडे कल दिसून येत आहे. नितीन सावंत यांनी उपजिल्हाप्रमुख पदाची सूत्र हाती घेतल्यापासून अनेक पक्ष प्रवेश होत असून या पक्ष प्रवेशाला उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, तालुका संघटक करुणा बडेकर, युवासेना कर्जत तालुका सचिव ॲड. संपत हडप, माजी सभापती प्रदीप ठाकरे, शाखाप्रमुख समीर साळोखे, शहरप्रमुख निलेश घरत, उपशहरप्रमुख विनोद पांडे (गुरव), युवासेना शहरअधिकारी गौरव भानुसघरे, उपशहरसंघटक राजेंद्र मोडक, उपविभागप्रमुख पाटीलआळी योगेश देशमुख, उपसंघटक पाटीलआळी कुणाल भोबू , उपशाखाप्रमुख निलेश गायकवाड हे उपस्थित होते.

# सुकापुरमध्ये धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर, नागरिकांच्या जीवाला धोका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापुरमध्ये नवजीवन सोसायटी एल १ या इमारतीचा स्लॅब कोसळून बारा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना १२ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. शुभम राजभर असे मृत मुलाचे नाव आहे. इमारतींचा पुनर्विकास रखडल्यामुळे स्लॅब कोसळण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचे दिसून येत आहेत. २३ गावांमध्ये नैना प्रकल्प येऊ घातलेला आहे. त्यामुळे इमारतींच्या पुनर्विकासासाठी परवानगी मिळत नाहीत, त्यामुळे आणखी किती जीव घेतल्यानंतर इमारतींच्या पुनर्विकासाला परवानगी मिळेल असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे.



सुकापुर ग्रामपंचायत हद्दीमध्ये पन्नासहुन अधिक धोकादायक इमारती झाल्या आहेत. यातील बहुतांशी इमारती जीर्ण झाल्या असून त्यात नागरिक वास्तव्य करत आहेत. ग्रामपंचायतीने इमारती खाली करण्यासाठी नोटीस देखील बजावल्या आहेत. असे असताना देखील नागरिक जीवावर उदार होऊन त्यात राहत आहेत. १२ डिसेंबर रोजी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास या नवजीवन सोसायटीच्या दुसऱ्या व पहिल्या मजल्यावरील स्लॅब कोसळला. यात तळमजल्यावर राहत असलेला शुभम सुरेश राजभर याचा मृत्यू झाला. यावेळी अग्निशामक दल आणि पोलिसांच्या मदतीने त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. पनवेल, नवी मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. त्यामुळे सुकापुरसह २३ गावांचा विकास नैना करणार असल्याचे घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे नवीन इमारतींचे बांधकाम करण्यासाठी नैनांची परवानगी क्रमप्राप्त करण्यात आली आहे. नैना शेतकऱ्याची ६० टक्के जागा फुकट घेणार आहे, त्यामुळे नैनाला २३ गावांमध्ये प्रचंड विरोध केला जात आहे. चार ते पाच गुंठे जागेतील इमारतीची जवळपास अडीच ते तीन गुंठे जागा नैनाला जाणार असल्याने उर्वरित दोन, अडीच गुंठे जागेत इमारत पूर्ण कशी होणार व सर्व सदस्यांना फ्लॅट कसे मिळणार या विवंचनेत फ्लॅट धारक अडकला आहे.

सुकापुर ग्रामपंचायत हद्दीत पन्नासहुन अधिक इमारती धोकादायक झालेले आहेत. यातील काही इमारती रिकाम्या करण्यात आल्या तर काही इमारतींमध्ये जीव मुठीत धरून नागरिक वास्तव्य करत आहेत. दर महिन्याला कोणत्या ना कोणत्या इमारतीचा स्लॅब कोसळतोच, त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यातच सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास स्लॅब कोसळल्याने बारा वर्षीय मुलाचा करुण अंत झाला. त्यामुळे अशा धोकादायक इमारतींमध्ये राहणारे नागरिक भीतीच्या वातावरणात वावरत आहेत. नैना प्रकल्पाच्या जाचक अटींमुळे शेतकरी भरडला जात आहे. त्यातच गेल्या दहा वर्षापासून नैनाचे भिजत घोंगडे असल्याने शेतकरी हवालदील झाला आहे.

स्वतःच्या जागेत तो बांधकाम देखील करू शकत नाही ही शोकांतिका आहे. त्यामुळे हा प्रकल्प आम्हाला नको अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. सुकापूर –पाली देवद येथील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत सिडको–नैना अधिकाऱ्यांच्या वारंवार बैठका घेऊन सुद्धा आणि वारंवार अधिकाऱ्यांसोबत पत्र पत्रव्यवहार करून सुद्धा आजपर्यंत सिडको–नैना प्रशासनाने या बाबतीत कुठलीच भूमिका घेतलेली नाही. नागरिकांचा व शेतकऱ्यांचा विरोध असलेला हा नैना प्रकल्प शास–नाने कायमचा रद्द करावा जेणेकरून जागामालकाला स्वतः पुनर्विकास करता येईल अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

**इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी वारंवार नोटीस देण्यात आलेल्या आहेत. तसेच धोकादायक इमारतीबाबत नैना प्रशासनाला देखील कळविण्यात आलेले आहे.**

**सुदिन पाटील ग्रामसेवक,**
**पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायत**

# मोफत ही आफतच

भारतात बोकाळत चाललेल्या रेवडी संस्कृतीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागेच खरपूस टीका केली होती. नागपूरमध्ये ११ प्रकल्पांचे एकत्रित उद्घाटन किंवा भूमिपूजन करताना मोदी यांनी ही चर्चा आणखी व्यापक आणि आक्रमक केली आहे. कुणाचेही नाव न घेता त्यांनी 'काही राजकीय पक्षांवर' केलेला शॉर्ट कट राजकारणाचा आरोप काही प्रमाणात योग्य आणि खरा आहे. त्यांचे या भाषणातले प्रमुख लक्ष्य आम आदमी पक्ष असावा, असे दिसते. कारण, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हेच सर्व प्रचारांमध्ये मोफत सोयीसुविधांच्या भरमसाट घोषणा करीत असतात. उत्तर भारतातल्या अनेक निवडणुकांमध्येही इतर पक्षांनी निवडून आल्यास मुलांना मोफत कम्प्युटर देण्यापासून वाट्टेल त्या घोषणा केल्या होत्या. निवडणुकांमध्ये पक्षांनी नेमकी किती व काय आश्वासने द्यायची आणि त्यांच्या या आश्वासनांच्या आर्थिक बाजूचे हिशेब कोणी व कसे ठेवायचे, हा प्रश्न सोपा नाही. हा मुद्दा काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाकडे नेण्यात आला आणि तसाच तो न्यायव्यवस्थेकडेही गेला आहे. मात्र, पंतप्रधान आज इतर पक्षांना या मोफतबाजीबद्दल आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करीत असले तरी त्यांनी २०१४ मध्ये जेव्हा प्रथम निवडणूक जिंकली; तेव्हा त्यांच्या पक्षाच्या काही नेत्यांनी इंधनांच्या किमती तसेच डॉलर आणि रुपया यांचा विनिमय दर याबाबतही वाट्टेल ते तारे तोडले होते. गेल्या आठ वर्षांतील इंधनाच्या किंमतींचा प्रवास आणि डॉलरची किंमत पाहिल्यानंतर तीही आश्वासने कशी चूक आणि मतदारांना भ्रमित करणारी होती, हे वेगळे सांगायला नको. उद्या प्रचारात एखाद्या शहाण्याने 'मी एका डॉलरला एक रुपया असे विनिमन मूल्य आणून दाखवेन,' असे म्हटले तर ती मतदारांची दिशाभूल तर ठरेलच पण तो एक मोठा सत्यालाप असेल. असे सत्यालाप भारतात प्रत्येक निवडणुकीच्या प्रचारात होत असतात आणि यात एकाही पक्षाचा अपवाद नाही. पंतप्रधान मोदी अलीकडे हा विषय वारंवार लावून धरत आहेत. तेव्हा त्यांनी अशा बेलगाम प्रचाराला आळा घालण्यासाठी कायदेशीर किंवा आचारसंहितेच्या रूपाने कसा आळा घालता येईल, या दृष्टीने आणखी ठोस प्रयत्न करायला हवेत. पंतप्रधानांनी या भाषणात विदर्भातल्या तीन दशके रखडलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाचे उदाहरण दिले. तो वेळेत न झाल्याने त्याचा खर्च चारशे कोटींवरून १८ हजार कोटी रुपयांवर गेला. हा सगळा पैसा शेवटी आपला म्हणजे भारतातल्या प्रत्येक नागरिकाच्या खिशातून जाणाऱ्या कराचा आहे. तेव्हा तो सरकारने आणि नोकरशाहीने 'विश्वस्त' या नात्याने खर्च करायला हवा. खरेतर, पाण्याचा प्रत्येक थेंब जसा अनमोल; तसाच सरकारी तिजोरीतला नागरिकांचा प्रत्येक पैसा अनमोल, हा संस्कार भारतात झालेलाच नाही. नाहीतर, गेल्या ७५ वर्षांत लाखो कोटी रुपयांची उधळपट्टी, भ्रष्टाचार आणि गैरखर्च झालेच नसते. स्वातंत्र्यापूर्वी हा संस्कार महात्मा गांधी यांनी दिला होता. तो तरी आपण कुठे लक्षात ठेवला आहे? देशाच्या सर्वांगीण आणि दीर्घकालीन विकासासाठी खिरापती वाटत न बसता मोठ्या योजनांची पूर्तता करायला हवी, हे मोदी यांचे म्हणणे योग्यच आहे. मात्र, आज देशभरात खासदार निधी, आमदार निधी आणि स्थानिक पातळीवर नगरसेवकांना मिळणारा निधी या साऱ्यांची बेरीज केली तर ती हजारो कोटी रुपयांमध्ये जाईल. पुष्कळदा या निधींमधूनही टिकाऊ, भरीव किंवा भविष्यवेधी कामे न होता अनेकदा मोफतबाजीच चालते. केंद्र व देशातल्या राज्य सरकारांनी सर्व खासदार आणि आमदारांवर उडविलेली ही 'रेवडी'च आहे; असा आक्षेप एखाद्याने घेतला तर तो चूक म्हणता येईल का? अप्रिय निर्णय घेण्यास मोदी जर कचरत नसतील तर त्यांनी या वाढतच चाललेल्या खासदार व आमदार निधींनाही चाप लावायला हवा. त्याऐवजी, सगळी विकासकामे ही नियोजन आणि योग्य त्या योजनांमधूनच व्हायला हवीत. मोदी यांनी या भाषणात दीर्घकालीन दृष्टी हवी, असे म्हटले आणि अशी दृष्टी दाखविणे म्हणजे पायाभूत विकासाच्या योजनांना गती होय, असेही सांगितले. हे योग्यच आहे आणि केंद्र सरकारने गेल्या आठ वर्षांमध्ये 'प्रगती' या पुढाकारातून वर्षानुवर्षे थांबलेल्या, गती मंदावलेल्या योजनांना जी चालना दिली, तिचे स्वागत आणि कौतुक करायला हवे. गोसीखुर्द हा त्यातलाच एक प्रकल्प होता. दर महिन्याच्या चौथ्या बुधवारी अडकलेले प्रकल्प मार्गी लावणे, हे काम चालू आहे. लाखो कोटींचे प्रकल्प यातून मार्गी लागले. मात्र, यात आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. तो म्हणजे, वित्तीय कार्यक्षमता. प्रत्येक पैशाचा शंभर टक्के उचित विनियोग होण्याची आवश्यकता. विकासाची चर्चा ही केवळ आश्वासनांपुरती मर्यादित राहता कामा नये. ती आणखी सखोल, व्यापक आणि भविष्यवेधी व्हायला हवी. मोफतबाजी ही देशासाठी आफत असतेच. मात्र, हे शिकण्याची गरज केवळ विरोधकांना नाही. सर्वांनाच आहे.

---

HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
MAHARASHTRA MARITIME BOARD
Indian Mercantile Chambers, 3rd Floor,
14 Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate, Mumbai - 400 001.
Tel.: [illegible], Fax : [illegible]

गृह विभाग (बंदरे व परिवहन)
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड
[illegible]

Website : https://mahammb.maharashtra.gov.in Email : [illegible]@gmail.com

[illegible]

Main Portal : https://mahatenders.gov.in

[illegible]

| अ.क्र. | कामाचे नाव | [illegible] (रु.) | [illegible] (रु.) | [illegible] (रु.) | [illegible] |
|---|---|---|---|---|---|
| १ | [illegible] | १,२०,७२,४४५/- | ४,६१,०००/- | ३,५४०/- | १८ महिने ([illegible]) |

[illegible]

https://mahatenders.gov.in [illegible]

[illegible]

सही/-
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई

क्र.आरओसी-२०२२-२३/क्र.५/सी ४७०४

---

## मराठा आरक्षणासाठी अनवाणी पायी दिंडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठा आरक्षणाचा प्रश्न न्यायप्रविष्ठ असल्याकारणाने राज्य शासनाने मेगा भरती त्वरित थांबवावी तसेच मराठा समाजाला आरक्षण द्यावे, या मागणीसाठी दत्ताभाऊ पाटील (वय ३१) या तरुणाने नांदेड ते मुंबई अनवाणी पायी दिंडी काढली आहे. नांदेड जिल्ह्यातील हादगावपासून १६ नोव्हेंबरला दत्ताभाऊ पाटील याने पायी प्रवास सुरू केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर या पायी प्रवासाची सांगता होणार आहे. साधारणतः रोज २५ ते ३० किलोमीटर प्रवास करून रात्री मिळेल तिथे मुक्काम करणाऱ्या या तरुणाने मराठा आरक्षणासाठी आगळेवेगळे आंदोलन सुरू केले आहे. दत्ताभाऊ पाटील हा पनवेलमध्ये आला असता त्याचे स्वागत करण्यात आले.

---

## रोटरी कर्णबधीर शाळेची जनजागृती रॅली उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील रोटरी क्लब पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट संचालित कर्णबधीर मुलांच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली खांदा कॉलनी नवीन पनवेल येथे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी रॅलीस सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी दिव्यांगांसंबंधी जनजागृतीच्या घोषणा देऊन लोकांचे लक्ष वेधून घेतले. विदयार्थी व शिक्षकांच्या हाती दिव्यांगांच्या संबंधी घोषवाक्यांचे पोस्टर हाती देण्यात आले होते. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनीनीलयबद्ध पद्धतीने लेझीमवर नृत्य सादर केले. खांदा कॉलनीतील वीर हॉस्पिटल पासून रॅलीला सुरुवात करण्यात आली. श्री कृपा हॉल ते अष्टविनायक हॉस्पिटल पेट्रोल पंप व शेवटी सिडको जलकुंभ सेक्टर ११ जवळ रॅलीची सांगता झाली. पोलीस विभागातून सलीम तडवी व उदय देसाई यांनी आवश्यक ते सहकार्य केले. दिव्यांगांची रॅली काढण्यामागचा मुख्य उद्देश हा समाजातील प्रत्येक घटकांनी दिव्यांगांच्या प्रति सहानुभूती न दाखवता त्यांना संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तींच्या समस्या समजावून घेता याव्यात याबाबत समाजात जनजागृती व्हावी, दिव्यांगांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांच्या उध्दारासाठी मदत मिळावी. म्हणून शाळेमार्फत या रॅलीचे आयोजन करण्यात आल्याचे संस्थेचे चेअरमन अरविंद सावळेकर यांनी सांगितले या रॅलीस संस्थेचे चेअरमन अरविंद सावळेकर, सचिव प्रमोद वालेकर, क्लब अध्यक्ष कल्पेश परमारप्रकाश श्रुंगारपुरे, चारुदत्त भगत, व्ही. सी. म्हात्रे, गुरुदेवसिंग कोहली, माधुरी कोडुरु रोटेरियन्स यांचेसह शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बंदसोडे , अधिक्षक सतीश माटेकर,वाचा उपचार तज्ञ संजय होन शाळेचे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विदयार्थी व पालकवर्ग आदि सहभागी झाले होते.

---

## रुपेश दांडेकर व धनंजय म्हात्रे डायमंड ऑफ द इयर -2022 पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार दिनानिमित्ताने अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या तर्फे करनाल - हरीयाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या डायमंड ऑफ द इयर अवॉर्ड २०२२ या राष्ट्रीय पुरस्काराने रुपेश मोहन दांडेकर व धनंजय म्हात्रे यांना नुकतेच सन्मानित करण्यात आले. अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून केलेल्या जनजागृतीच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.धनंजय म्हात्रे यांनी व संघटनेच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून जिद्दीने जे काम केले त्यामुळेच आज सन्मान करण्यात आला तसेच या संपूर्ण प्रवासात आपल्या मुरुडचे सहकारी यांनी मला केलेल्या सहकार्यानेच मला हा सन्मान मिळाला आहे.

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

**अर्जदारांचे वकील : ॲड.अतुल सुनील जोशी**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८४६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०१/२०२३

१) श्री.मिलींद श्रीराम नित्सुरे व इतर २ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.श्रीराम दत्तात्रय नित्सुरे यांचे दि.०६/०७/२०२२ रोजी देहावसान झाले असूनत्यांच्या मृत्यूसमयीच्या वास्तव्याचा पत्ता : रा.१२ उदय बिल्डींग, घंटाळी रोड घंटाळी मंदिराजवळ, ठाणे ४००६०२ असा आहे. अर्जदार क्र.१) श्री.मिलींद श्रीराम नित्सुरे, २) श्रीमती.शैलजा श्रीराम नित्सुरे आणि ३) सौ.मनिषा नचिकेत आपटे यांनी कै.श्रीराम दत्तात्रय नित्सुरे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसदाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मिळकत धारकाचे नाव कै.श्रीराम दत्तात्रय नित्सुरे**
**रुम नं.१०१, पहिला मजला, यशोदा अपार्टमेंट, मराठी कन्या शाळेजवळ, शिवाजी रोड पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**

वर नमूद अर्जदार हे कै.श्रीराम दत्तात्रय नित्सुरे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कलावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय अर्जदार क्र.१, २ व ३ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.श्रीराम दत्तात्रय नित्सुरे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हा वारसदाखला मंजूर करेल.

आज दि.१३/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : जामगांव, ता.रोहा, जि.रायगड येथील मिळकत श्री.धर्मा कानू जांभळे यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जामगांव, ता.रोहा, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| धर्मा कानू जांभळे | १५५ | ०-३८-४० | ६-४४ |

मौजे : जामगांव, ता.रोहा, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.धर्मा कानू जांभळे यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/१२/२०२२

**सही/-**
**मयुरेश प्र. हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

---

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that my client MRS. FAVANA AMITH, presently residing at- Flat no. A/301, OM APT. Plot No- 65, Sector-20, Kharghar, Navi Mumbai, Pin- 410210, have lost/misplaced the 'Original Agreement to sale' and 'Share Certificate no. 55, of the Flat no. C- 103, Hawares Gulmohar CHS, Plot No- 52 & 56, Sector- 20, Kharghar, Navi Mumbai, Pin- 410210, which is duly registered at Sub- registrar office Panvel 3, on dated- 01/07/2005, under Document serial no. PVL3-02100-2005, Receipt no. 2101, at some where in Kharghar, Navi Mumbai. It is humbl request If any person/s found the said 'Original Agreement to sale' please returne it to my office address or my client's residence address given above within 7 days from the date of publication hereof. It should be noted that in case of misuse of the said documents, it will not be binding on the above owners. Otherwise the applications for duplicate Agreement to sale' have to move to the concern sub registrar- office and for share certificate to the said society by my client. My office address given herein below.

Place: Kharghar, Navi Mumbai,
Date: 13-12-2022.

SD/-
**Adv. Yogendra L. Dubey**
(Advocate High Court)
Office no. 06, Phenix Residency, Plot No. 64, Sector- 20, Kharghar, Navi Mumbai, Pin-410210.
Mob-9820668773.

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक मेसर्स शिवकृपा कोलोसाल एल.एल.पी.तर्फे भागीदार १) श्री.महादेव पुंजालाल पटेल, २) श्री.प्रतापसिंग रवींद्र देशमुख, ३) श्री.देवजी जीवराज पटेल, ४) श्री.महेश नरसिंग चौधरी यांचे मालकी हक्कांची, ताबेकब्जातील मिळकत / सदनिका आमचे अशिल श्री.मनोहर काशिनाथ चौगुले आणि सौ.सुप्रिया मनोहर चौगुले रा.सदनिका क्र.३०२, शिवकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.२५, सेक्टर १२, बँक ऑफ इंडिया जवळ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : करंजाडे, शिव रेसिडेन्सी, सदनिका क्रं.५१०, प्लॉट नं.३६, सेक्टर-०३, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्र २६.३२० चौ.मी.**

सदरहू मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे इजमेंट, कुळ वहिवाटीचा हक्क, दावे, फरोक्त, साठेकरार, वचनपत्र-ावती, वारसाहक्क, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, लीन, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, जाणे येणेच्या रस्त्याचा हक्क वा अन्य कोणत्याही हक्काने काही हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा व सबंधितांना ही नोटीस झालेपासून ०७ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा त्या सोडून ल्यिा आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणर नहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१३/१२/२०२२

**सही/-**
**ॲड.अर्चना म्हस्कर**
**शिवकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.२५,**
**बँक ऑफ इंडियाजवळ, सेक्टर १२,**
**कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.९९२०७७७९७९**

---

### जाहीर नोटीस

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्रीमती. सुगंधा सुधीर मुळे व २) श्री.अद्वैत सुधीर मुळे, दोघेही सज्ञान, रा.मुलुंड, मुंबई-४०००८१ यांचे सामाईक नांवे वारस हक्काने मालकी अधिकार व हक्काची सदनिका क्र.सी-३१, दुसरा मजला, यशोमंगल को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., पनवेल जिचा मालमत्ता क्र.६३२, ६३३ व ६३३/१, डॉ.आर.डी.पटवर्धन मार्ग, पनवेल, जि.रायगड-४१०२०६ मिळकत आहे. जिचे तपशिलवार वर्णन खालीलप्रमाणे :-

**परिशिष्ट**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | सदनिका क्र.सी-३१, दुसरा मजला, यशोमंगल को.ऑ.हौसिंग सोसायटी लि., पनवेल येथील मालमत्ता क्र.६३२, ६३३ व ६३३/१, डॉ.आर.डी.पटवर्धन मार्ग, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ | ६२५.०० चौ.फुट (बिल्टअप) |

उपरोक्त दोहोंची सामाईक सदनिका मिळकत वरील नमूद मालकांच्या वारसा हक्काने गेली ५ वर्षे निर्विवादपणे ताबेकब्जा व निरंतर वहिवाटीत आहे. त्यानुसार सदर सदकि मिळकत ही आमचे अशिलांनी आर्थिक मोबदल्याचे बदल्यात कायम खुषखरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध, दान, तारण, गहाण, बक्षिस, फरोक्त, अन्न, वस्त्र, दिवाबत्ती, पोटगी, जामीन, वहिवाट, कुळ, विश्वस्त, मुखत्यार, विकसनकरार, बांधकाम करार, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसाहक्क, बयाणा, तबदील या अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत खाली सही करणार वकील यांचेकडे योग्य त्या सर्व मुळ कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. त्याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती व पुरावे व पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. त्याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती दाखल कराव्यात. त्याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती व पुरावे न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या उपरोक्त दोन मालकांसोबत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदर नोटीसीच्या विरुद्ध वर्तमानपत्रातील छापलेल्या जाहिराती, हरकती व सुचना तसेच मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही सुचना व हरकती, माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१३/१२/२०२२

**सही/-**
**ॲड.श्री.सचिन मा.कल्याणकर**
**प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला,**
**मिडलक्लास हौ.सो.लि., युनियन**
**बँकेच्यावर गांधी हॉस्पिटलच्या बाजूला,**
**सुरूची हॉटेल समोर, मुंबई-पुणे हायवे**
**जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.क्र.९७६८३६६७१४/९८७०९८६१३५**

---

मा.गोडसे सो

**प्रोसेस जमा रु.५०/- अर्जदारतर्फे वकील यशवंत शंकर पाटील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८५५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२३/०१/२०२३

मनोज कृष्णणकुट्टी व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार हे मयत श्री.टी कृष्णणकुट्टी यांचा मुलगा आहे. दि.०९/०७/२०१६ रोजी श्री.टी कृष्णणकुट्टी यांचे राहत्या घरी एरणाकुलम केरला, येथे मयत झालेले असून ते मदासेरी चिकुस विला, ३६१ ऐ, कुन्नुकरा, अलुवा, इरणाकुलम, केरला येथील रहिवाशी होते. कायद्यातील तरतुदीनुसार कै.श्री.टी कृष्णणकुट्टी यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.श्री.टी कृष्णणकुट्टी हे हयात असताना त्यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे. सदर मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**रुम नं.१/७, प्लॉट नं.१३, गंगा को.हौ.सो.लि.,**
**सेक्टर-१६, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**(क्षेत्रफळ : १०४६.४० स्क्वे.मी.एरिया)**

ही मिळकत ह्या अर्जाचा विषय आहे.

वर वर्णन केलेली मिळकत कै.श्री.टी कृष्णणकुट्टी यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांचे नावे व्हावे याकरिता आवश्यक तो वारसा दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदर मिळकतीबाबत कै.श्री.टी कृष्णणकुट्टी यांच्या कायदेशीर वारस असल्याचा वारसा दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदरच्या वारसा दाखल्याचे कामी कोणत्याही व कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसाच्या आत सदर न्यायालयात पुराव्यासह हजर राहून कायदेशीररित्या हरकती नोंद कराव्यात. सदर नोटीशीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१२/१२/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो

**ॲड.सुनील एन. मोरे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८३५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०१/२०२३

१) श्री.अरविंद शंकर शिंदे
वय : ७१ वर्षे, व्यवसाय : काहीही नाही
२) श्री.रोहित अरविंद शिंदे
वय : ४० वर्षे, व्यवसाय :नोकरी
अर्जदार नं.१ व २ रा.फ्लॅट नं.४०३, बी विंग,
अदिनाथ अल्पाईन, प्लॉट नं.२८ अे, सेक्टर २५,
कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०९
३) श्री.योगेश अरविंद शिंदे
वय : वर्षे,
फ्लॅट नं.७०३, बि विंग, संस्कृती को.ऑप.हौसिंग
सोसायटी, पी सी एम सी स्कूल कस्पेट वस्ती,
पुणे, वाकड, पुणे-४११०५७ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांची आई कै.शोभा अरविंद शिंदे या दि.०२/०९/२०२२ रोजी बी ॲण्ड जे सुपरस्पेशालिटी येथील हॉस्पिटलमध्ये मयत झाले. कै.शोभा अरविंद शिंदे यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत या सिडकोच्या अधिकार क्षेत्रात आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन** (i)
**मौजे कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील**
**फ्लॅट नं.४०३, बि-विंग, चौथा मजला,**
**अदिनाथ अल्पाईन, प्लॉट नं.२८ अे,**
**सेक्टर-२५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मिळकतीचे वर्णन** (ii)
**मौजे वाकड, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, ता.मुळशी, जि.पुणे येथील**
**सर्व्हे नं.२३७/१ पैकी, क्षेत्र २९३४ चौ.मी.**
**फ्लॅट नं.६०२, सहावा मजला, बी-विंग, नवदीप या स्कीममधील**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१३/१२/२२ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# कर्जत नगर परिषदेतर्फे महिला व मुलींसाठी व्यवसाय प्रशिक्षण



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगर परिषद महिला व बालकल्याण समितीच्या वतीने कर्जत शहरातील महिला व मुलींना स्वतःचा व्यवसाय स्वयंरोजगार मिळवण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नगरपरिषदेच्या सभागृहात प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले, याप्रसंगी महिला व बालकल्याण समिती सभापती विशाखा जिनगरे, उपसभापती संचिता पाटील, मागासवर्गीय समाज कल्याण विशेष समिती सभापती वैशाली मोरे, नगरसेविका पुष्पा दगडे, भारती पालकर, मधुरा चंदन,सुवर्णा निलधे, नगरसेवक बळवंत घुमरे आदी उपस्थित होते.

इंडोटेक फाउंडेशनच्या रेश्मा खरात आणि कविता खरात यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, या प्रशिक्षण शिबिरात डव्हान्स ब्युटी पार्लर प्रशिक्षण, कराटे व जुडोचे प्रशिक्षण, रेडिमेड गारमेंट (टेलरिंग) चे प्रशिक्षण, डव्हान्स बेकरीजन्य पदार्थ बनविणे यांचा समावेश आहे. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी मार्गदर्शनात म्हणाल्या महिला ही घराची, कुटुंबाची आधारस्तंभ असते, महिलांनी वेगवेगळ्या प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहिला पाहिजे याचा विचार करून नगरपरिषदेच्या माध्यमातून मुली, महिलांसाठी हे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले आहे असें सांगितले. महिला व बाल कल्याण विभागाच्या सायली निंबरे यांनी आभार मानले यावेळो महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# रेल्वेच्या धडकेत अज्ञात व्यक्ती जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मानसरोवर ते खारघर रेल्वे स्टेशनवर रेल्वेच्या धडकेत एक व्यक्ती जखमी अवस्थेत आढळल्याने पनवेल उपजिल्हा रुग्णालयात त्याला उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. पनवेल पोलीस या जखमी व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत.

जखमी व्यक्तीचे वय अंदाजे २० वर्षे, उंची पाच फूट सहा इंच, अंगाने मध्यम, चेहरा उभट, नाक सरळ, केस वाढलेले काळे, मिशी बारीक आहे. अंगात काळा टी शर्ट, निळी जीन्स आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे दुरध्वनी–०२२२७४६७१२२ किंवा मोबाइल क्रमांक ९४९४९१२२९४ यावर संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आर. आर. पाटील यांनी केले आहे.

# खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते वैजनाथ येथे श्री बापुजी महाराज मंदिराचा लोकार्पण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील वैजनाथ येथे श्री बापुजी महाराज मंदिराचा लोकार्पण सोहळा रायगड रत्नागिरी जिल्ह्याचे कार्यसम्राट खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

वैजनाथ गावचे श्रद्धास्थान असलेल्या श्री.बापूजी महाराज मंदिराचे जिर्णोद्धार व कळशारोहण या कार्यक्रमाचे आयोजन ता.९ व १० डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमातंर्गत मंदिराचा लोकार्पण सोहळा खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सर्वदर्शनाचार्य महंत विवेकानंद शास्त्री विभागिय नेते महेंद्र पोटफोडे, नारायण धनवी, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, सुरेश महाबळे, विणा चितळकर, नरेंद्र जाधव, मनोज शिर्के, भाई पोटफोडे, नरेंद्र पवार, योगेश धामणसे, सरपंच मानसी चितळकर, रंजना टवळे, सुरेखा पारठे, सुचिता परबळकर, सुरेखा पार्ठे, कांचन मोहिते, जनार्दन महाबले, दत्त–ात्रेय वातेरे, मनोज सावरकर, काशिनाथ वातेरे, जानू वातेरे, चिंतामणी सावरकर,सुयोग धमणसे, सुरेश चोरगे, महादेव घरट आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खा.सुनील तटकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना वैजनाथ गाव आणि तटकरे परिवार यांचे पुर्वापार असणारे ऋणानुबंधनाचे नाते हे कायमच राहणार असून या गावाच्या विकासनिधीसाठी कधीही निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे अभिवचन शेवटी त्यांनी दिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी उपसरपंच जनार्दन महाबळे यांनी केले.तर सुत्रसंचलन नंदकुमार मरवडे यांनी केले.

या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ वैजनाथ, नवतरुण मित्र मंडळ,एकता फाऊण्डेशन मित्र मंडळ वैजनाथ यांनी मोलाचे सहकार्य केले.




मा.सोनावणे सा़ो

**अर्जदाराचे वकील ॲड.प्रतिभा पाटील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सा़ो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८५३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२४/०१/२०२३

सौ.चंद्रभागा अंबाजी म्हात्रे व इतर ५ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मयत जानकीबाई नारायण मोकल यांचे दि.१८/०२/२०२१ रोजी रांजणपाडा, ता.उरण येथे झाले असून तीचे सहहिस्सेदार ह्यांचे मौजे : न्हावा, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : न्हावा, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव / यु.के.नं. | सर्वे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. | पोटखराबा हे.आर. |
|---|---|---|---|
| न्हावा–८८ | अ–५०<br>अ–६४ | १–२२–०<br>१–१५–४ | ०–६३–०<br>०–५५–० |

त्याअर्थी सदर अर्जदार यास त्याचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कगदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज दि.१३/१२/२०२२ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गुन्नाल सा़ो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**हर्षदा सुनील गडकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२८४/२०२२
नि.नं.११/ड
ने.ता.२०/०१/२०२३

१) रोशन जेकब जोस थरकन
S/O जोस पी.चाको
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.१०६, गणेश कृपा सी.एच.एस.
प्लॉट नं.३६, सेक्टर नं.६, नवीन पनवेल
२) जोली जोस
W/O जोस पी.चाको
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
३) आशा एलिझाबेथ जोस
D/O जोस पी.चाको
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
तर्फे कुलमुखत्यारी रोशन जेकब जोस थरकन
अ.क्र.२ व ३ रा.फ्लॅट नं.३०२, बी विंग,
क्लासिक्स सृष्टी सी.एच.एस., प्लॉट नं.३०,
सेक्टर नं.३, नवीन पनवेल (पु.), जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ व ३ यांनी त्यांचे वडील आणि अर्जदार क्र.२ हीने तिचे पती जोस पी. चाको यांचे मुंबई येथे दि.२३/०८/२०१८ रोजी निधन झाले. मयत जोस पी.चाको यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.३०२, बी विंग, तिसरा मजला, क्षेत्र ४६५ चौ.फूट बिल्टअप, क्लासिक्स सृष्टी को–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.३०, सेक्टर नं.३, नवीन पनवेल (पु.), नवी मुंबई, जि.रायगड**

**आणि**

**फ्लॅट नं.१०६, पहिला मजला, क्षेत्र ४४.२४ चौ.मीटर कारपेट, गणेशकृपा बिल्डींग, प्लॉट नं.बी–३६, सेक्टर नं.६, नवीन पनवेल (पु.), नवी मुंबई, जिल्हा : रायगड**

वरील फ्लॅट मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३ माहे डिसेंबर सन २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल मेसर्स ईलाइट फ्रेनेस्ट्रेशन प्रा.लि.तर्फे डायरेक्टर ताहिरी सादिक हुसैन मोदी यांनी मेसर्स नाईस प्रिटींग इंक कोटींग्जचे प्रो.प्रा.थेराथील जॉनसन जॉर्ज यांचेकडून त्यांच्या मालकीची खालील वर्णनाचा बांधीव प्लॉट कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार व करार केलेला आहे. सदरील बांधीव प्लॉटचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**प्लॉटचे वर्णन**

Plot No.W-223 (A), Taloja Industrial Area M.I.D.C., Village-Palekhurd, Taluka-Panvel, Dist-Raigad-area 720 Sq. Mtrs.

तरी वर वर्णन केलेल्या प्लॉटचे कोणी व्यक्ती, इसम, कंपनी अथवा कोणतेही दान, गहाण, तारण, लिन, लीज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांना ती कागदपत्रे पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसात आत मला माझे खालील पत्यावर समक्ष भेटून अथवा रजिस्टर पोस्टाने आपली हरकत पाठवून खात्री करून घ्यावी. उपरोक्त १५ (पंधरा) दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर प्लॉट / मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणाच्याही तक्रारी, हरकती, रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.१४/१२/२०२२

**सही/–**
**ॲड.के.पी.सय्यद**
**(एल.एल.एम.)**
**वकील, उच्च न्यायालय, मुंबई**
**शॉप नं.६, निल इम्पायर को.ऑ.हौ.सो.,**
**प्लॉट नं.३ ए/४, सेक्टर–२५, नेरुळ**
**(ई), नवी मुंबई–४००७०६**

मा.गुन्नाल सा़ो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**हर्षदा सुनील गडकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८१३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२३/०१/२०२३

१) नुजहत अमीर शेख
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) जमीला अमीर शेख
वय : ७५ वर्षे, धंदा : गृहिणी
३) नसरीन अमीर शेख
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
अ.क्र.१ ते ३ सर्व रा.फ्लॅट नं.०५,
पहिला मजला, अे विंग, खान प्लाझा
बिल्डींग, पटेल मोहल्ला, पनवेल,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
४) नसीम रियाज सौदागर
पुर्वाश्रमीची नसीम अमीर शेख
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.अे–२, ई वॉर्ड, सौदागर
रेसिडेन्सी, प्लॉट नं.२३/६/७, ताराबाई
पार्क, पितळी गणपती मंदिराजवळ,
कोल्हापूर, जिल्हा : कोल्हापूर
५) शकीला अल्ताफ फरास
पुर्वाश्रमीची शकीला अमीर शेख
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.५२५, बी वॉर्ड, बाराइमाम,
एम.एल.जी.शाळेजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर, जिल्हा : कोल्हापूर — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांचे वडील आणि अर्जदार क्र.२ हीने तीचे पती अमीर अब्दुल हई शेख यांचे पनवेल येथे दि.२२/०७/२०२० रोजी निधन झाले. मयत अमीर अब्दुल हई शेख यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल नगरपरिषदेच्या हद्दीतील सिटी सर्व्हे प्रॉपर्टी प्लॉट नं.४१/०, ४२/०, ४२/१ ते ४२/६ या मिळकतीतील खान प्लाझा या इमारतीत फ्लॅट नं.४, पहिला मजला, अे विंग, क्षेत्र ६५० चौ.फूट बिल्टअप, पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील फ्लॅट मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३ माहे डिसेंबर सन २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## NOTICE

Notice is hereby given to all concerned that We, 1) Mohammad Shafi Mohammad Yusuf Patel, Residing at – Village Taloje, Post Taloja Pachnand, Tal-Panvel, Dist-Raigad, for self and as Power of Attorney Holder for Sr. No 2/1 to 2/6 and 3 to 10, 2/1) Mujamil Abdul Majid Patel, 2/2) Sarfaraz Abdul Majid Patel, 2/3) Shahanaz Abdul Majid Patel, 2/4) Tasmeen Begum Zulfikar Ali Mulla, 2/5) Shabina Zuber Patel, 2/6) Najiya Tausif Mulla, 3) Mhd. Amin Mohammad Yusuf Patel, 4) Abdul Wahab Mohammad Yusuf Patel, 5) Abdul Rashid Mohammad Yusuf Patel, 6) Riyaz Mohammad Yusuf Patel, 7) Khanam Shaukat Patel, 8) Shamina Ayub Namare, 9) Khadija Mhd. Amin Patel, and 10) Faimidabibi Mhd. Ayub Patel, Nos. 2/1 to 2/6, 3 to 10 all residing at – Village Taloje, Post Taloja Pachnand, Tal-Panvel, Dist-/Raigad, above No. 01 for self and as Power of Attorney Holder for Sr. No 2/1 to 2/6 and 3 to 10, Vide Power of Attorney dated 21/10/2022 appointed 1) Vishal Parnath Mhatre having address 37, Navade, Near Hanuman Mandir, Valavali, Pale Budruk, Tal-Panvel, Dist-Raigad and 2) Samadhan Dattaray Cheke having address : Room NO. 73, Near Marathi School, Nangangaon, Saramb, Buldhana – 443 206 for purposes of to look after our personal properties, family properties and many other purposes which is more particularly set out in the said Power of Attorney dated 21/10/2022.

We do hereby state and declare that the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke have not done any acts pursuant to the aforesaid Power of Attorney.

We do hereby state and declare that, we have revoked, cancelled and terminated the said Power of Attorney dated 21/10/2022 executed by us in favour of the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke by executing appropriate Deed of Revocation dated ……/12/2022, We have already informed to said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke by letter to which the Deed of Revocations is annexed. We do hereby state that, we have absolutely and completely revoked all powers or authority there under given to him to all intents and purposes.

We do hereby state and declare that the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke has no concern with any of our personal properties and the properties in which my share involves. Any person/s dealing with the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke may do so entirely at their risks as to the costs and consequences thereof and I shall not be responsible for the same in any manner whatsoever.

Dated this 13/12/2022

Sd/-

1) Mohammad Shafi Mohammad Yusuf Patel No. 01 for self and as Power of Attorney Holder for Sr. No 2/1 to 2/6 and 3 to 10
2/1) Mujamil Abdul Majid Patel
2/2) Sarfaraz Abdul Majid Patel
2/3) Shahanaz Abdul Majid Patel
2/4) Tasmeen Begum Julfikar Ali Mulla
2/5) Shabina Juber Patel
2/6) Najiya Tausif Mulla
3) Mhd. Amin Mohammad Yusuf Patel
4) Abdul Wahab Mohammad Yusuf Patel
5) Abdul Rashid Mohammad Yusuf Patel
6) Riyaz Mohammad Yusuf Patel
7) Khanam Shaukat Patel
8) Shamina Ayub Namare
9) Khadija Mhd. Amin Patel
10) Faimidabibi Mhd. Ayub Patel
Above Sr. No. 2/1 to 2/6 and 3 to 10 through its constituted Attorney Mohammad Shafi Mohammad Yusuf Patel

**अर्जदाराचे वकील : ॲड.वृषाली घरत**

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर ह्यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२३१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०१/२०२३

१) श्रीमती.भिमाबाई रमेश पाटील
वय : ५९ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.भगवान पाटील चाळ, हनुमान गल्ली,
कांजूर गाव, कांजूरमार्ग पुर्व, मुंबई ४०००४२
२) अविनाश रमेश पाटील
वय : ४० वर्षे, व्यव : नोकरी
रा.भगवान पाटील चाळ, हनुमान गल्ली,
कांजूर गाव, कांजूरमार्ग पुर्व, मुंबई ४०००४२
३) अर्चना रमेश पाटील
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.भगवान पाटील चाळ, हनुमान गल्ली,
कांजूर गाव, कांजूरमार्ग पुर्व, मुंबई ४०००४२
४) श्री.सुरेश भरत पाटील
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.भगवान पाटील चाळ, हनुमान गल्ली,
कांजूर गाव, कांजूरमार्ग पुर्व, मुंबई ४०००४२
५) मारिया हेन्ड्रीक डिमेलो
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर क्र.७, शास्त्री नगर, कांजूर मार्ग
पुर्व मुंबई ४०००४२
६) श्रीमती.वंदना संतोष पाटील
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड
७) श्रीमती.शोभा नटेश्वर भोपी
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड
८) श्री.हेमंत जयवंत भगत
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड
९) श्रीमती.प्रियांका अजित पंडित
वय : ४० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड
१०) अलका नारायण परदेशी
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.भिंगारी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील नमूद अर्जदार यांनी कै.हौसा उर्फ हौसाबाई उर्फ हाशीबाई भरत पाटील यांचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा दिवाणी चौकशी अर्ज या मे.कोर्टात दाखल केला आहे. कै.हौसा उर्फ हौसाबाई उर्फ हशीबाई भरत पाटील यांचा मृत्यू दि.३१/०८/२००३ रोजी झाला. तर त्यांचा मुलगा कै.रमेश भरत पाटील ह्यांचा मृत्यू दि.१२/१२/२००५ रोजी झाला. तर त्यांची मुलगी नामे कै.निर्मला जयवंत भगत हिचा मृत्यू दि.१३/११/२०१३ रोजी झाला. कै.हौसा उर्फ हौसाबाई उर्फ हशीबाई भरत पाटील यांचे मालकीची ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : जासई, नवघर, सावरखार, ता.उरण, जि.रायगड येथे मिळकत होती व आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**१) मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकत**

| युनिट केस नं. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.जी.आर | हे.आर. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १८८ | ३१ | २ | १–२९–० | ०–६९–८ | २–८८ |

**२) मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकत**

| युनिट केस नं. | सर्वे नं. | हि.नं. | क्षेत्र ए.जी.आर | हे.आर. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| ४४०(२)/८३–८४ | ७६ | १ | ०–२–४ | ०–०२–३ | ०–४४ |
| | ८४ | २ | ०–६–४ | ०–०६–४ | ०–८७ |
| | ८९ | ८ | ०–३–८ | ०–०३–५ | ०–५० |
| | ९६ | १४ | ०–०३–१२ | ०–०३–८ | ०–६२ |
| ५०–८२–८३ | २४ | ३ | ०–१९–४ | ०–१९–५ | १–७८ |
| ४४०–८५–८६ | ५३ | १४ | ०–४–० | ०–०४–० | ०–७६ |
| | ६७ | १ | ०–४–४ | ०–०४–३ | ०–५३ |
| | १०७ | ८ | ०–२–८ | ०–२–५ | ०–३१ |
| | १३८ | ५ | ०–०४–० | ०–०४–० | ०–४१ |
| | ११५ | ९ | ०–०१–४ | ०–१–४ | ०–१२ |
| | १३२ | ६ | ०–२–० | ०–२–० | ०–३१ |
| | १३५ | ५ | ०–१६–८ | ०–१६–७ | २–३१ |
| | १४७ | ४ | ०–३–८ | ०–३–५ | ०–३७ |
| | २८२ | २ | ०–६–१२ | ०–६–८ | ०–७५ |
| | २८३ | १२ | ०–८–० | ०–८–० | १–०० |

**३) मौजे : सावरखार, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकत**

| युनिट केस नं. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.जी.आर | हे.आर. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| २५० | १४९ | २ | ०–२५–१२ | ०–२६–० | १–५० |

वरील नमूद मिळकत ही शासनाकरिता सिडकोमार्फत संपादीत करण्यात आलेली आहे. सदर मिळकतीच्या बाबतीत जाहीर होणारे १२.५ टक्के विकसित भूखंड हे अर्जदार यांच्या नावे जाहीर होणार आहेत. व त्याकरिता अर्जदार यांनी कै.हौसा उर्फ हौसाबाई उर्फ हशीबाई भरत पाटील यांचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा चौ. अर्ज दाखल केला आहे. सदर चौकशी अर्जाच्या कामी अर्जदार यांनी केलेल्या मागणीबाबत जर कोणाला हरकत घ्यायची असेल तर ती त्याने सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत उरण येथील सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात घेण्याची आहे. १ महिन्यानंतर आलेल्या हरकतीला फेटाळण्यात येईल याची तमाम जनतेने दखल घ्यावी.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कोठे तरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राकेश ठाकूर (वय ३५) रा. वावंजे, अंगाने मजबूत, उंची १७५ सेमी, चष्मा वापरतो, दाढी – मिशी असून केसांची ठेवणं साधी, नाक सरळ आहे अंगात निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट, पायात काळ्या रंगाचा शूज आणि सोबत मोबाईल फोन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी क्रमांक ०२२– २७४५२४४४ किंवा पोलीस हवालदार एम.एस.भूमकर मो. नं ९६९९९९१६५१ यांच्याशी संपर्क साधावा

## जिम ट्रेनर सह सहकारी जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

किरकोळ कारणावरून एका जिम ट्रेनर सह त्याच्या सहकाऱ्याला क्रिकेट च्या बॅट ने मारहाण केल्याची घटना खारघर मध्ये घडली आहे.

खारघर वसाहतीमधील सेक्टर १३ मध्ये गाडी मागे घेण्याच्या किरकोळ कारणावरून कार मधून आलेल्या चौकडीने जिम ट्रेनर अलेक्स डिकोस्टा व त्याच्या सहकाऱ्याला क्रिकेट च्या बॅट ने बेदम मारहाण करून ती चौकडी पसार झाल्याने या बाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील डेरवली गावातून एक महिला राहत्या घर–ातून कोणास काही न सांगता निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार पोलीस बेपत्ता महिलेचा शोध घेत आहेत. शोभा चंद्रकांत चव्हाण (वय ५०) असे बेपत्ता महिलेचे नाव असून उंची अंदाजे पाच फूट, रंग गोरा, बांधा मजबूत, केस काळे व लांब, अंगात साडी नेसलेली आहे. सोबत कपड्यांची बॅग आहे. ही महिला डेरवली येथील राहत्या घरातून न सांगता निघून गेली असल्याने संतोष चंद्रकांत चव्हाण यांनी ती हरविल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात केली. या महिलेबाबत कोणास माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस नाईक डी. एस. चव्हाण यांनी केले आहे.

# माथेरानसाठी ई रिक्षा वरदानच

**दै.रायगड नगरी । माथेरान**



क्षणभंगुर मर्यादित आयुष्यातील जीवनात केवळ वर्तमानाचा विचार करून चालत नाही तर धावत्या युगाप्रमाणे स्वतःच्या इच्छाशक्ती आणि सध्याच्या भौगोलिक परिस्थितीचा साधकबाधक विचार करून स्वतःमध्ये आणि आपल्या परंपरागत पिढ्यानपिढ्या रुळलेल्या व्यवसायाला बाजूला सारून ज्यातून केलेल्या कष्टाचे चीज होऊ शकते. अन व्यावासायिक दृष्टीने स्वाभिमानी बनून ताठ मानेने आपल्या नव्या व्यवसायात परिवर्तन घडवून आणण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करणाऱ्या श्रमिक हातरीक्षा चालकांना मानाचा मुजरा करावा लागेल यात शंकाच नाही. एखादी नवीन घटना आणि बदल घडवून आणण्यासाठी जुन्या काळातील रूढींना वेळप्रसंगी जर का तिलांजली दिली नाही तर जुन्याच राहाटगाड्यात आयुष्य कधी एकदाचे संपून जाते याचे भान सुध्दा रहात नाही आणि शेवटी पूर्वापार चालत आलेल्या व्यवसायात एकएक पिढी व्यसनाधीन होऊन अक्षरशः लयास गेलेली माथेरान करांनी उघड्या डोळ्यांनी पाहिलेली आहे.

हातरीक्षा ओढणे हा काही फार मोठा व्यवसाय नाही तर इथले स्थानिक आणि त्यांच्या जोडीला अन्य ठिकाणांहून आलेले कष्टकरी श्रमिक हे नाईलाजाने ह्या व्यवसायात गुरफटून गेले होते त्यांना आशेचा किरण दिसत नव्हता की या अमानवीय प्रथेतून कायमस्वरूपी सुटका कशाप्रकारे होईल याबाबत सुतराम कल्पना नव्हती रक्ताचे पाणी करून पहाटेपासून ते रात्रीपर्यंत हातरीक्षा ओढून व्यसन केल्याशिवाय झोप येणार नाही अशीच परिस्थिती या श्रमिकांची झाली होती. त्यांनाही सन्मानाचे जीवन जगण्याची प्रबळ इच्छाशक्ती होती.त्यावेळी सध्याचे निवृत्त शिक्षक सामाजिक कार्यकर्ते सुनील रामचंद्र शिंदे यांना ही अमानवीय प्रथा भावली नाही या सर्व श्रमिकांना ब्रिटिश कालीन गुलामगिरी मधून मुक्तता मिळवून देण्यासाठी मुळात हा व्यवसाय बदलला पाहिजे.माथेरान हे पर्यावरण दृष्टीने संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यामुळे आणि त्यातच इथे कोणत्याही प्रकारच्या मोटार वाहनांना बंदी असल्याने पर्यावरण पूरक ई रिक्षा हाच एकमेव पर्याय उपलब्ध होऊ शकतो त्यासाठी सुनील शिंदेंनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू केला परंतु इको सेन्सेटिव्ह झोन या ठिकाणाला असल्याने त्यांच्या या प्रश्नांची उकल कुणीही घेत नव्हते.सर्वानी हात वर केले होते. बहुतांश मंत्री महोदयांनी सुध्दा हे ई रिक्षाचे प्रकरण खूपच किचकट असल्याने आणि इको सेन्सेटिव्ह झोन मुळे मदत करण्यासाठी पुढे येत नव्हते.इथले शालेय विद्यार्थी जवळपास तीन ते चार किलोमीटर पायपीट करून पालकांना दप्तराचे ओझे घेऊन शाळेपर्यंत जावे लागते,अपंग, रुग्ण त्याचप्रमाणे जेष्ठ नागरिकांना अत्यावश्यक सेवा उपलब्ध व्हावी जे वयोवृध्द पर्यटक आहेत ज्यांना अनेक वर्षांपासून माथेरान पाहण्याची इच्छा होती त्यांना या स्थळाची माहिती व्हावी यासाठी तत्कालीन आमदार जोगेंद्र कवाडे यांच्या ही बाब निदर्शनास आणून दिली होती त्यावेळी कवाडे यांनी अनेकदा विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता तर कर्जत खालापूर मतदार संघाचे तत्कालीन आमदार सुरेश लाड यांनीही काहीवेळा हाच प्रश्न विधानसभेत उपस्थित केला होता. याबाबत सुनील शिंदेंनी आपल्या मित्रांसह नागपूर येथे जाऊन तत्कालीन मंत्री नितीन गडकरी यांची सुध्दा भेट घेतली होती.अखेरीस या महत्वाकांक्षी प्रकल्पाला मान्यता मिळावी आणि माथेरानच्या श्रमिकांना या अमानवीय प्रथेतून मुक्ती मिळावी यासाठी सुप्रीम कोर्टात धाव घेतली काही वर्षे यासाठी थांबावे लागले. शेवटी सुप्रीम कोर्टाने माथेरान मधील भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन इथे प्रायोगिक तत्त्वावर तीन महिन्यांसाठी ई रिक्षा सुरू करावी असे निर्देश दिल्यावरून नुकताच डिसेंबर २०२२ मध्ये ई रिक्षा धावत आहे.

माथेरान मध्ये एक अत्यावश्यक सुविधा उपलब्ध झाली आहे. सुरुवातीला कोणत्याही चांगल्या कामाला विरोध होतोच यात वाद नाही परंतु कालांतराने याच सेवेचा स्वीकार सर्वांना करावा लागणार आहे हे सुध्दा नाकारता येणार नाही. ई रिक्षा मुळे बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत आणि त्यांनाही सन्मानाचे जीवन जगता येणार आहे. या रिक्षांची संख्या सुध्दा मर्यादित असून फक्त ९४ रिक्षा याठिकाणी धावणार आहेत. मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यापासून गावात येण्यासाठी नागरिकांना, पर्यटकांना ३५ रुपये एवढे नाममात्र भाडे आहे.तर शालेय विद्यार्थ्यांना केवळ पाच रुपये भाडे असणार आहे. या सेवेमुळे याठिकाणी आगामी काळात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची संख्या निश्चितपणे वाढणार असून सर्वानाच रोजगार निर्मिती होण्याची चिन्हे दिसत आहेत. पर्यटकांची वाहतूक करणारे स्थानिक व्यवसायिक दस्तुरी नाक्यावर व्यवसाय करत नाहीत त्यामुळे गावातून पॉइंट्स साठी याच स्थानिकांना व्यवसाय मोठ्या प्रमाणात प्राप्त होणार आहे.ई रिक्षा सारख्या महत्वपूर्ण प्रकल्पाला राजकीय पक्षांकडून पाठिंबा दिला जात नाही. काही राजकीय पक्षांची मंडळी सुध्दा दिशाभूल करून विकासाला अडचणी निर्माण करण्यात मशहूर दिसत आहेत त्यांना मतांच्या लालसेपोटी फक्त नगरपरिषदेच्या सभागृहात जाऊन सत्ता उपभोगायची आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ही राजकीय मंडळी कार्यरत नसून सत्तेचा लाभ कशाप्रकारे घेता येईल यासाठी यांचे प्रयत्न सुरू आहेत.

**माथेरान मध्ये ब्रिटिश काळा पासून हात रिक्षाची प्रथा सुरू आहे ती तशीच रहावी असा विचार करणारा एक गट आजही कार्यरत आहे श्रमिकांच्या रक्ताचे होणारे पाणी याची त्यांना पर्वा नाही येथील हे लोक ई रिक्षा विरोधात अधिकाऱ्यांना चुकीची माहिती देत असतात ई रिक्षा मुळे १५०० कुटुंब उध्वस्त होतील अशी खोटी माहिती पसरवतात. परंतु सत्य वस्तु–स्थितीत माथेरानला फक्त ९३५ कुटुंब आ–हेत. ई रिक्षाचा विषय न्यायप्रविष्ठ असल्याने या विरोधात दाद त्यांनी न्यायालयात गेले पाहिजे न्यायालयाचा सन्मान प्रत्येक नागरिक करीत असतो.**

**सुनील शिंदे –याचिकाकर्ते,**
**सामाजिक कार्यकर्ते माथेरान**

## सरपंचाच्या पतीसह तिघांना न्यायालयीन कोठडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेस्ट हाऊस बांधण्याकरता सव्वा लाख रुपये मागून त्यापैकी एक लाख आठ हजार रुपये स्वीकारल्या प्रकरणी सरपंचाच्या पतीसह तिघांना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या तिघांवर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाजपच्या खानाव ग्रामपंचायत सरपंच जयश्री दिसले यांचे पती शशिकांत दिसले, बाबू उर्फ सचिन दिसले व दीपक तवले यांनी रंजना अहिरे यांच्याकडे गेस्ट हाउस सुरू करण्याकरता सव्वा लाख रुपये मागितले.

त्यातील १ लाख ८ हजार स्वीकारून यापुढेही एक लाख रुपये महिना द्यावा लागेल नाहीतर जेसीबीने सर्व उडवून टाकेल अशी धमकी अहिरे याना देण्यात आली. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करताच तिघांनाही अटक करण्यात आली.

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे माजी कृषीमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिते, कुंभे, बोर्ले यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वाकस ग्रामपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिरचोली, देऊळवाडी, वाकस,चोरावळे शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.त्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कर्जत तालुका महिला अध्यक्षा ड रंजना धुळे, राष्ट्रवादी युवकचे तालुका उपाध्यक्ष अक्षय सुभाष जाधव, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते डॉ. राकेश पाटील, वाकस ग्रामपंचायत सदस्य मंगेश पवार,भरत शेळके,दिपक मोरे,वाकस ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत पवार,राष्ट्रवादी युवकचे संघटक विकास शेळके, मोहन दळवी, राष्ट्रवादीचे युवा कार्यकर्ते निलेश घरत,धिरेश जाधव,वाळकु माळी,विलास दळवी, रवींद्र थोरात आणि शिक्षिका, मोहित जाधव,सुशांत बोराडे आदि मान्यवर उपस्थित होते.




### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# ‘जी-20’ म्हणजे काय रे भाऊ?

भारतात पहिल्यांदाच जी २० या देशांची परिषद होणार आहे. यामध्ये अर्जेन्टीना,ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, जर्मनी, जपान, फ्रान्स, भारत, इंडोनेशिया, इटली, रशिया, दक्षिण अफ्रिका, दक्षिण कोरीया, तुर्की आणि युनाटेड किंग्डम या देशांचा समावेश आहे. या देशांचे प्रतिनिधी त्यांच्या सांस्कृतिक, औद्योगिक वैशिष्टयांसह भारतात येणार आहेत. महाराष्ट्रातही जी २० च्या निमित्ताने युद्धपातळीवर काम सुरू झाले असून, राज्यात या परिषदेच्या निमित्ताने एकूण १४ बैठका घेण्यात येणार आहेत. यापैकी ८ बैठका या मुंबईत, ४ पुण्यात तर नागपूर आणि संभाजीनगर येथे प्रत्येकी एक बैठक आयोजित करण्यात येणार आहे. देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यवर व्यक्तींचा सहभाग असणार आहे. या बैठकांचे नियोजन योग्य व्हावे, यासाठी राज्याचे प्रधान सचिव आणि राजशिष्टाचार विभागाच्या अधिकाऱ्यांवर विशेष जबाबदारी देण्यात आली आहे. मुख्य सचिव स्तरावरही देखरेखीसाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे. मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी स्वत: या बठकींच्या तयारी बाबत आढावा घेतला. जी २० परिषदेनिमित्त महाराष्ट्र राज्याला जगासमोर प्रदर्शित करण्याची संधी मिळणार आहे. राज्याचे ब्रॅन्डींग, राज्यातील विकासाचे प्रकल्प, आपली संस्कृती, जगासमोर मांडण्याची संधी लाभली आहे. यादृष्टीने राज्यात गतीने कामे सुरु करण्यात आली आहेत. यंदाचे जी २० परिषेदेचे यजमान पद हे भारताला मिळाले आहे. त्यामुळे राज्य सरकारने या बैठकांसाठी कंबर कसली आहे.

सामन्य माणसाला हा प्रश्न पडला असेलच की जी–२० म्हणजे नेमकं काय? तर जी २० म्हणजे ग्रुप ऑफ ट्वेन्टी. हा जगातल्या प्रमुख विकसित आणि विकसनशील अशा २० देशांचा राष्ट्रगट आहे. १९९९ साली या राष्ट्रगटाची स्थापना करण्यात आली होती. पूर्व आशिया आणि आग्नेय आशियात १९९७ साली आलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर जी २० गट उदयास आला. अशा एखाद्या जागतिक आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी प्रमुख देशांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत हा त्यामागचा मुख्य हेतू होता.

सुरुवातीला केवळ या देशांचे अर्थमंत्री आणि तिथल्या केंद्रीय बँकांचे गव्हर्नर एकत्र येऊन आर्थिक प्रश्नांवर चर्चा करीत असत. २००८ च्या आर्थिक संकटानंतर या देशांचे राष्ट्रप्रमुख दरवर्षातून एकदा जी २० लीडर्स समिट म्हणजे राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेत सहभागी होऊ लागले. सध्या जी २० राष्ट्रगटात भारताशिवाय अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रांस, जर्मनी, इंडोनेशिया, इटली, जपान, दक्षिण कोरिया, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, ब्रिटन, अमेरिका अशा १९ देशांचा समावेश आहे. युरोपियन युनियन ही संघटना या राष्ट्रगटातला विसावा सदस्य आहे. या व्यासपीठाचा सर्वात मोठा उद्देश आर्थिक सहकार्य आहे. यात सामील असलेल्या देशांचा एकूण जीडीपी जगभरातील देशांच्या ८० टक्के आहे. हे गट आर्थिक रचनेवर एकत्र काम करतात. तसेच आर्थिक स्थैर्य, हवामानातील बदल आणि आरोग्याशी संबंधित मुद्यांवर चर्चा केली जाते. परिषदेचा मूळ उद्देश आर्थिक परिस्थिती कशी स्थिर ठेवायची आणि कशी टिकवायची हा आहे. यासोबतच हे व्यासपीठ जगाच्या बदलत्या परिस्थितीचाही विचार करते आणि त्यासंबंधित महत्त्वाच्या मुद्यांवरही लक्ष केंद्रित करते. त्यात व्यापार, शेती, रोजगार, ऊर्जा, भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई, दहशतवाद आदी मुद्यांचाही समावेश आहे. त्याशिवाय संयुक्त राष्ट्रे, जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, वर्ल्ड बँक अशा आंतराष्ट्रीय संघटनांचे प्रमुख तसेच काही देश पाहुणे म्हणून शिखर परिषदेत सहभागी होतात.

संयुक्त राष्ट्रांचे जसे न्यूयॉर्कमध्ये कार्यालय आहे, तसे जी २० देशांचे कायमस्वरूपी कार्यालय किंवा सचिवालय नाही. अजेंडा आणि समन्वय साधण्याचे काम जी २० देशांचे प्रतिनिधी करतात ज्यांना ‘शेरपा’ म्हणून ओळखलं जातं. दरवर्षी एका देशाकडे जी २० च अध्यक्षपद येतं. यालाच जी २० प्रेसिडंसी म्हणतात. प्रत्येक प्रेसिडंसीच्या शेवटी जी २० राष्ट्रगटाची बैठक होते आणि कारभार पुढच्या अध्यक्षांवर सोपवला जातो. जी २० चे विद्यमान अध्यक्ष आधीचे आणि पुढचे अध्यक्ष राष्ट्र यांच्या मदतीनं कारभार चालवातात. सध्या भारत हा इंडोनेशिया आणि ब्राझीलच्या मदतीनं जी २० चा कारभार पाहील.

भारत हा जी–२० चा संस्थापक सदस्य आहे. भारत डिसेंबर २०२२ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत जी २० चे अध्यक्षपद भूषवणार असल्याने, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जी २० अध्यक्षपदाच्या नव्या बोधचिन्हाचे (लोगो) ८ नोव्हेंबरला अनावरण केलं. भारताला आपली संस्कृती, इतिहास आणि पर्यटन क्षमता दर्शविण्याची आणि जगातील एक प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून स्वत:ला स्थान देण्याची उत्तम संधी प्राप्त होणार आहे. जी २० सदस्य देशांपैकी चीन, मेक्सिको, भारत, दक्षिण आफ्रिका आणि इंडोनेशिया या देशांना कोविड नंतर त्यांच्या पर्यटन उद्योगाचा विस्तार करण्यास उत्तम संधी प्राप्त होणार आहे. भारताच्या जी २० गटाच्या अध्यक्षपदासह, भारत निश्चितपणे या चार ते पाच देशांच्या पुढे जाऊन जागतिक क्षेत्रात भारताच्या पर्यटन उद्योगाचे योग्य स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करेल.

भारताची जी–२० प्रेसीडेंसी थीम वसुधैव कुटुंब–काम किंवा एक पृथ्वी एक कुटुंब एक भविष्य आहे. एका चांगल्या भविष्यासाठी, एका समान उद्दिष्टांसाठी संपूर्ण जगाला एकत्र आणण्यासाठी भारताने निश्चिती केलेली जी २० थीम महत्त्व–ाची ठरणार आहे. रशिया आणि युक्रेन मध्ये चालू असलेले युध्द आणि जगातील इतर दशांमधील आपापसातील वाढणारे तणाव यामुळे जगाची महायुध्दाकडे जाण्याची वाटचाल लक्षात घेऊन जागतीक शांततेच्या उद्देशाने भारत सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहे. कोणतेही पहिले जग किंवा तिसरे जग नसून केवळ एक जग असावे असा भारताचा प्रयत्न असेल. तत्पूर्वी, भारताने याच भावनेने काम सुरू केले– ‘एक सूर्य, एक जग, एक ग्रीड’ ने जगात अक्षय ऊर्जा क्रांतीची हाक दिली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे चालल्या लोकाभिमूख शासनाला शंभरहून अधिक दिवस झाले आहेत. या कालावधीत या शासनाने जनतेच्या हितासाठी, जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे, शेतकरी, नोकरदार, उद्योजक, पर्यटन अशा विविध क्षेत्रांशी निगडीत सामान्य जनतेला केंद्र बिंदू मानून विविध असे महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. कृषी, सहकार, पणन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, पाणीपुरवठा व स्वच्छता, उच्च व तंत्रशिक्षण, उद्योग, सार्वजनिक बांधकाम विभाग, वने, उर्जा, पर्यावरण, पर्यटन अशा विविध महत्त्वाच्या विभागांचा विकास व्हावा. या विभागांमार्फत जनसामान्यांना उत्तम सेवासुविधा मिळाव्या या दृष्टीकोनातून महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. दळणवणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आणि महाराष्ट्राची भाग्यरेषा ठरणारा हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाची निर्मिती हा टर्निंग पॉईंट ठरला आहे. भारताला जी २० चे अध्यक्षपद भुषवण्याची संधी मिळाल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली चालल्या लोकाभिमूख शासनाला पुन्हा एकदा सिध्द करण्याची आणि संपूर्ण देशात आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण करण्याची संधी प्राप्त झाली आहे. या संधीचे हे शासन नक्कीच सोन करुन दाखवेल यात काडीमात्र शंका नाही. महाराष्ट्र शासनाने कमी कालावधीत विकासाच्या दृष्टीने जे काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी वेळोवेळी होत आहे. शासनाने नियोजित केलेले उपक्रम, योजना त्या त्या वेळेनुसार अंमलात आणले जात आहेत. आणि त्याचा लाभ सामान्य जनतेला होताना दिसत आहे. त्यामुळे जी २० परिषदे निमित्त भारतात आणि मुख्यत्वे महाराष्ट्रात येणाऱ्या जी २० सदस्य देशाचे अर्थमंत्री आणि तिथल्या केंद्रीय बँकांचे गव्हर्नर, गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये गुतवणुक, नवनवीन उपक्रम, योजना राबविण्यासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

**प्रविण डोंगरदिवे**
**उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

## राष्ट्रवादीचे पनवेलमध्ये मोफत आरोग्य शिबिर संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज राष्टवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागातर्फे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, पद्मविभूषण, खासदार शरदचंद्र पवार व सौ.प्रतिभा शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त एस.जी.डी पब्लिक स्कूल, प्लॉट नं.२८, सेक्टर–१०,खांदा कॉलनी, पनवेल येथे राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग पनवेल शहर जिल्हाध्यक्ष किशोर देवधेकर सर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोफत आरोग्य शिबिर संपन्न झाले.

सदर आरोग्य तपासणी शिबीराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डि.वाय.पाटील हॉस्पिटलच्या चमूने मोफत डोळे तपासणी केली. डोळे तपासुन चश्म्याचे नंबर काढुन देण्यात आले. अल्पदरात चश्मे देण्यात आले. २ शिबिरार्थींना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विना औषधी अँक्युप्रेशर चिकित्सेद्वारे आयुष हिलिंग सेंटर, नवीन पनवेल मधील उमेश शर्मा यांनी विविध आजारावर अँक्युप्रेशर उपचार केले. आई हॉस्पिटलचे बालरोग तज्ञ डॉ. विकास गंडाळ यांनी लहान मुलांवर उपचार केले. व स्त्रीरोग तज्ञ डॉ.अश्विनी गंडाल यांनी महिलांची तपासणी करुन समुपदेशन केले.

सदर प्रसंगी किशोर देवधेकर सर (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग पनवेल शहर जिल्हा), डॉ.अमित शिनगारे(पनवेल शहर जिल्हा उपाध्यक्ष) डॉ. जयदेव काळभोर (अध्यक्ष खांदा कॉलनी राष्ट्रवादी डॉक्टर सेल), महेशकुमार राऊत (राष्ट्रवादी काँग्रेस प्रभाग ५ अध्यक्ष) आदी प्रमुख पदाधिकारी व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## पनवेलच्या ग्रामीण भागात गोवरचा रुग्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात गोवरचा एक रुग्ण सापडला आहे. त्याच्यावर घरीच उपचार सुरू असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. पनवेल तालुक्यात सद्यस्थितीत गोवरचे संशयित २३ रुग्ण असून त्यापैकी १ जण पॉसीजीव आला आहे. उलवे येथे १ वर्षाच्या मुलाला गो–वरची लागण झाली आहे. तो मुलगा सध्या घरी आहे. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात ९९ टक्के मुलांना गोवरची लस देण्यात आली आहे. ० ते ५ वर्षे वयोगटतील मुलांचे लसीकरण झालेले आहे. तरी देखील सर्वेक्षण सुरू असल्याची माहिती पंचायत समिती पनवेल आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. एखाद्या ठिकाणी गोवरचा संशयित रुग्ण सापडला की पुन्हा परिसरात सर्व्हेला सुरुवात केली जाते.